साप्ताहिक

■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस



मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १८ ● अंक १४ ● मंगळवार, दि. २६ ऑगष्ट ते २ सप्टेंबर २०२५ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू.

## योगेश कुंभेजकर यांनी जिल्हाधिकारी पदाची सूत्रे स्वीकारली

वाशिम, दि. २१ ऑगस्ट (जिमाका) - जिल्ह्याचे नवीन जिल्हाधिकारी म्हणून योगेश कुंभेजकर यांनी आज २१ ऑगस्ट रोजी पदाची सूत्रे स्वीकारली. यावेळी अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील आणि निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी त्यांचे स्वागत केले. श्रीमती बुवनेश्वरी एस. यांची राज्य शासनाने अकोला येथे महाबीजच्या व्यवस्थापकीय संचालकपदी बदली केली आहे. त्यांच्या जागी वाशिम जिल्ह्याचे नवे जिल्हाधिकारी म्हणून योगेश कुंभेजकर यांची नियुक्ती करण्यात आली. यासंदर्भातील आदेश सामान्य प्रशासन विभागाने २० ऑगस्ट रोजी जारी केले होते.

नुतन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर हे २०१६ बॅचचे आयएएस अधिकारी असून, त्यांनी यापूर्वी




भंडारा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तसेच नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून यशस्वी कामकाज पाहिले आहे. वाशिम येथे रुजू होण्यापूर्वी ते महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत होते.

## राज्य व जिल्हास्तरीय जागतिक कौशल्य स्पर्धा

### २३ वर्षाखालील पात्र उमेदवारांनी ऑनलाइन नोंदणी करावी

वाशिम, दि. २५ ऑगस्ट (जिमाका) - जगातील सर्वात मोठी व्यावसायिक शिक्षण व कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा म्हणून ओळखली जाणारी जागतिक कौशल्य स्पर्धा दर दोन वर्षांनी आयोजित केली जाते. ही स्पर्धा ऑलिंपिक खेळांच्या धर्तीवर होत असून, २०२६ मध्ये ती शांघाई येथे पार पडणार आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी वाशिम जिल्ह्यातील २३ वर्षाखालील पात्र उमेदवारांनी https://www.skillindiadigital.gov.in या संकेतस्थळावर ३० सप्टेंबरपर्यंत ऑनलाइन नावनोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त . प्र. वा. खंडारे यांनी केले आहे. स्पर्धेच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने ६३ क्षेत्राशी संबंधित जिल्हा व राज्यस्तरीय कौशल्य स्पर्धा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, सेक्टर स्किल कौन्सिल आणि विविध औद्योगिक आस्थापना यांच्या सहकार्याने आयोजित केल्या जाणार आहेत.

जिल्हा, विभाग, राज्य आणि देशपातळीवरील फेऱ्यांतून निवडलेल्या उमेदवारांचे नामांकन पुढील जागतिक स्पर्धेसाठी पाठवले जाणार आहे. या निमित्ताने सर्व ITI, पॉलिटेक्निक, MSME Tools Rooms, CIPET, अभियांत्रिकी महाविद्यालये, IHM² Hospitality Institute, Corporate Technical Institute, Skill Training Institute, Colleges, Maharashtra State Skill University, MSBVET, Private Skill University, Fine Arts College, Flower Training Institute, Institute of Jewellery Making तसेच महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी अधिनस्त सर्व व्यवसाय प्रशिक्षण संस्था यांना विद्यार्थ्यांना व उमेदवारांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धेसाठी वयोमर्यादा हा एकमेव निकष आहे.

५० क्षेत्रांसाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००४ किंवा नंतरचा असणे आवश्यक. तर १३ क्षेत्रांसाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००१ किंवा नंतरचा असणे अनिवार्य आहे. या क्षेत्रांची सविस्तर माहिती https://www.skillindiadigital.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.असे कौशल्य विकास विभागाने कळविले आहे.

## पांगरी महादेव येथे भव्य आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

वाशिम,दि. २५ ऑगस्ट (जिमाका) मंगरुळपीर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र वनोजा अंतर्गत ग्राम पांगरी महादेव येथे भव्य आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात गावातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत एकूण १६४ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

या तपासणीत १४ नवीन बी.पी. रुग्ण व २ डायबेटीज रुग्ण आढळून आले. तसेच ७२ नागरिकांच्या रक्त तपासण्या घेण्यात आल्या असून त्यामध्ये CBC, LFT, KFT, HIV, HBSAg तसेच Sickle Cell या चाचण्यांचा समावेश होता. यावेळी गावात साथरोग सर्वेक्षण व कंटेनर सर्वेक्षण करून डास अळी आढळून आलेले कंटेनर तत्काळ रिकामे




करण्यात आले. त्यामुळे नागरिकांना डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांविषयी जागरूकता निर्माण झाली. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र वनोजाचे संपूर्ण आरोग्य पथक उपस्थित होते. नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करून आरोग्य विभागाचे मनःपूर्वक आभार मानले.

## महत्वाचे

### जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत अनुकंपा तत्वावरील उमेदवारांची अंतिम प्रतिक्षा यादी जाहीर

वाशिम, दि. २५ ऑगस्ट (जिमाका) ह जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत अनुकंपा तत्वावरील उमेदवारांची माहे जुलै २०२५ अखेरची अंतिम प्रतिक्षा यादी जाहीर करण्यात आली आहे. ही यादी zpwashim.com या जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर तसेच कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर यादीतील पात्र उमेदवारांची मुळ कागदपत्र पडताळणी दि. २८ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषद वाशिम येथील वसंतराव नाईक सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. संबंधित उमेदवारांना पत्रव्यवहार करण्यात आले असून त्यांनी नियोजित स्थळी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा परिषद प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### २ सप्टेंबर रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन

वाशिम, दि.२५ ऑगस्ट (जिमाका) : दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. परंतु पहिला सोमवार १ सप्टेंबर रोजी स्थानिक सुटी असल्याने सप्टेंबर महिन्यातील लोकशाही दिन २ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. नागरीकांनी जिल्हास्तरीय लोकशाही दिनातील तक्रार अर्ज जिल्हा/तालुका लोकशाही दिनामध्ये सादर केल्यानंतर विहीत नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह लोकशाही दिनामध्ये १५ दिवस आधी दोन प्रतीत पाठविणे आवश्यक आहे. असे निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी कळविले आहे.

### फिट इंडिया सायकलिंग ड्राइव्ह विशेष उपक्रमात सायकलथॉनचे आयोजन

वाशिम, दि. २१ ऑगस्ट (जिमाका) : फिट इंडिया सायकलिंग ड्राइव्ह या विशेष उपक्रमांतर्गत वाशिम येथे सायकलथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा पोलीस अधिक्षक अनुज तारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा दि. २३ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता पोलीस मुख्यालय, वाशिम येथून सुरू होणार आहे. या स्पर्धेत जिल्ह्यातील युवक-युवतींसह सर्व इच्छुक सायकलस्वारांनी सहभागी व्हावे, असे आवाहन पोलीस उपअधीक्षक (गृह) प्रविण खंडारे यांनी केले आहे.

## उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय आणि ग्रंथमित्र पुरस्कारासाठी ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज मागविले

वाशिम, दि. २५ ऑगस्ट (जिमाका): राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास, वाचकांसाठी चांगल्या सेवा व वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयामार्फत दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार तसेच उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) यांना डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार देण्यात येतात. या पुरस्कारांतर्गत शहरी व ग्रामीण भागातील अ, ब, क व ड वर्गातील उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे एक लाख रुपये, ७५ हजार रुपये, ५० हजार रुपये व २५ हजार रुपये इतकी रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व ग्रंथभेट देऊन गौरविण्यात येणार आहे. याशिवाय, राज्यातील एक उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व एक उत्कृष्ट ग्रंथालय सेवक (ग्रंथमित्र) यांना प्रत्येकी ५० हजार रुपये तसेच प्रत्येक महसुली विभागातील प्रत्येकी एक कार्यकर्ता व सेवक यांना प्रत्येकी २५ हजार रुपये इतकी रोख रक्कम, सन्मानचिन्हे, प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट प्रदान करण्यात येईल. सन २०२४-२५ या वर्षासाठीचे अर्ज विहित नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह तीन प्रतीत संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे दि. ३० सप्टेंबरपर्यंत पाठविण्याचे आवाहन ग्रंथालय संचालनालयाचे प्र. संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे.

## जिल्हास्तरीय पशुवैद्यकीय संस्थांना द्रवनत्र / विर्यमात्रा पुरवठा करणेकरिता वाहतुकीसाठी दरपत्रके सादर करण्याबाबत सूचना

वाशिम,दि.२५ ऑगस्ट (जिमाका)सर्व मिनीट्रक वाहतूकधारकांना कळविण्यात येते की, सन २०२५-२६ मध्ये जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन, वाशिम यांच्या मार्फत वाशिम जिल्ह्यातील पशुवैद्यकीय संस्थांना द्रवनत्र / विर्यमात्रा पुरवठा करणेकरिता वाहतुकीसाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रक सादर करण्यासाठीचा नमुना / अटी व शर्ती प्राप्त करण्यासाठी इच्छुकांनी जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, वाशीम येथे रु. १०००/- (अक्षरी रुपये एक हजार फक्त) भरणा करून दिनांक ३१.०८.२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत नमुना प्राप्त करावा. दिलेल्या विहीत नमुन्यात भरलेली दरपत्रके दिनांक ०१.०९.२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, वाशीम येथे सादर करावीत. प्राप्त दरपत्रके दिनांक ०५.०९.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता नियुक्त समितीसमोर उघडण्यात येतील. वाहतुक दर हा प्रति कि.मी. नमूद करणे आवश्यक आहे. दर मंजूर अथवा नामंजूर करण्याचे सर्व अधिकार नियुक्त समितीकडे राहतील. समितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.असे (डॉ. अरुण यादगिरे) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, वाशिम यांनी कळविले आहे.

# ज्वालामुखी

एक पर्यावरणीय आपत्ती. भूअंतरंगातून भूपृष्ठाकडे किंवा भूपृष्ठावर होणाऱ्या तप्त पदार्थांच्या हालचाली. या हालचालींमुळे भूकवचाखालील घन, द्रव आणि वायू पदार्थ भूकवचाकडे किंवा भूपृष्ठावर ढकलले जातात. याला ज्वालामुखी क्रिया म्हणतात. पृथ्वीचा अंतर्भाग अत्यंत उष्ण आहे. भूपृष्ठाचा खडकावरील दाब कमी झाल्यास अतिउष्णतेमुळे खडक वितळून शिलारस तयार होतो. या शिलारसात अनेक वायू असतात. शिलारस खडकांना भेगा पाडून तो जमिनीवर साठतो. त्यामुळे शिलारसातील वायू वातावरणात मिसळतात. वायू बाहेर पडलेला शिलारस लाव्हारस म्हणून ओळखला जातो.

शिलारसातून बाहेर पडलेल्या वायूंत बाष्पाचे प्रमाण जास्त असते. याशिवाय कार्बन डाय-ऑक्साइड, सल्फर डाय-ऑक्साइड इ. वायूदेखील या वायूंच्या मिश्रणात असतात. ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे शिलारस, बाष्प, उष्ण चिखल, गंधक, इतर रासायनिक पदार्थ भूपृष्ठावर येऊन साचतात. त्यामुळे डोंगर व टेकड्या यांची निर्मिती होते. ही भूरूपे शंकू च्या आकाराची असतात. त्यांना ज्वालामुखीय शंकू म्हणतात. ज्वालामुखीचा खोलगट भाग हा ज्वालाकुंड म्हणून ओळखला जातो. यातून निघालेला लाव्हारस दूरपर्यंत पसरून लाव्हा पठाराची निर्मिती होते. नदीच्या खोऱ्यांना भेगा पडतात. त्यात शिलारस साठून नदीच्या प्रवाहाच्या दिशेत बदल होतो. पाण्याच्या प्रवाहात शिलारस साठल्यामुळे बांध तयार होतात. त्यामुळे जलाशयाची निर्मिती होते. अशा प्रकारे ज्वालामुखी होण्यापूर्वी असलेल्या प्राकृतिक पर्यावरणात लक्षणीय बदल होतात. या बदलांमुळे स्थानिक परिसंस्था विसकळीत होते. ज्वालामुखीतून बाहेर पडलेल्या उष्ण चिखलात प्राणी आणि वनस्पती गाडले जातात. ज्वालामुखीच्या भेगेतून उडालेले खडकाचे तुकडे ज्वालामुखीच्या मुखाजवळ पडतात; परंतु बाहेर पडणारी राख आणि वायू शेकडो किमी. दूर वाहून जातात. त्यामुळे वातावरण प्रदूषित होते. तसेच वातावरणात राख मिसळल्याने सूर्याची किरणे जमिनीवर पोहोचू शकत नाहीत आणि त्यामुळे वातावरण थंड होते. वातावरणाच्या निम्नस्तरातून भूपृष्ठाजवळून उष्ण राखेचे ढग सरकत जातात. अशा वेळी त्या परिसरातील तापमान सु.५००० से. पर्यंत वाढल्याचे आढळून आले आहे. राखेचे असंख्य कण पर्जन्यजलात किंवा हिमजलात मिसळतात. हा प्रचंड गाळ भूउतारानुसार सखल भागाकडे वाहतो. परिणामी त्या प्रवाहात सापडलेल्या वनस्पती आणि प्राणी यांचा ऱ्हास होतो. गाळ सपाट भागात साठून मातीचा कठीण थर तयार होतो. त्यामुळेही मोठ्या प्रमाणावर जीवांची हानी होते.

ज्वालामुखीच्या उद्रेकाच्या वेळी वायूंचे लोट बाहेर पडतात व वातावरणात मिसळतात. त्यामुळे विशाल ढगांची निर्मिती होते. हे ढग आकाशात दीर्घकाळ राहतात. त्यामुळे अनेकदा पाऊस पडतो. कार्बन डाय-ऑक्साइड वातावरणांत मिसळून दीर्घकाळ राहिल्यास मनुष्यासह इतर प्राण्यांना अपायकारक स्थिती निर्माण होते. उष्ण वायूंमुळे त्या परिसरातील तापमान वाढते.




# रिसोड तालुक्यातील विविध गावांमध्ये पोळा उत्साहात

## कुठे बैलांच्या अंगावर नेत्यांचा जयघोष : तर कुठे अतिवृष्टीचा संदेश

**रिसोड, दि. २४ (प्रतिनिधी)**

तालुक्यातील विविध गावामध्ये पोळा उत्सव मोठ्या आनंदाने साजरा करण्यात आला. यावेळी सुध्दा पोळा उत्सवाला महागाईचा फटका बसलेला दिसून आले, बैलांना पुरण पोळीचा घास भरवित गावाच्या वेशीमधुन मंदिराला फेरफटका मारीत पोळा आनंदात साजरा करण्यात आला.

मागील काही दिवसांपासून तालुक्यातील विविध गावांना अतिवृष्टीने थैमान घातल्याने शेतकरी वर्गावर मोठ्या प्रमाणात संकट ओढवले आहे.परंतु,या संकटामध्ये सुध्दा मोठ्या आनंदाने पोळा उत्सव साजरा करतानी कुठे बैलांच्या अंगावर आपल्या आवडीच्या नेत्याचा जय घोष, कुठे अतिवृष्टीने थैमान केल्याने शेतकरी संकटात अशा प्रकारचे संदेश लिहीत शेतकऱ्यांनी आपल्या व्यथांना वाट मोकळी केली. तालुक्यातील कुठल्याच गावामध्ये अनुचित प्रकार घडणार नाही, यासाठी ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वात अनेक गावांमध्ये पोळा उत्सवाला पोलिस, होमगार्ड उपस्थित होते,हे विशेष.

# सरसकट नुकसान भरपाई द्यावी ;नकूल देशमुख यांचे पालकमंत्री यांना पत्र

**रिसोड** : राज्याचे कृषिमंत्री तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री ना दत्तात्रय भरणे हे वाशिम जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे रिसोड मालेगाव विधानसभा क्षेत्रातील पिकाची नुकसान संदर्भात पाहणी करण्याकरता जिल्हा दौऱ्यावर होते त्यांच्या समवेत भाजप रिसोड मालेगाव विधानसभा निवडणुक प्रमुख नकुल देशमुख यांनी रिसोड मालेगाव विधानसभा क्षेत्रातील नुकसानीची पाहणी केली. महागाव, बायखेड, वाकद, बोरखेडी, शेलू खडसे, शिरपूर, मसला, राजुरा येथे भेट दिली. तसेच शेतकरी बांधवांच्या सोबत संवाद साधला.

यावेळी पालकमंत्री दत्तात्रय भरणे बोलताना म्हणाले कि वाशीम जिल्हा आणि रिसोड मालेगाव तालुक्यातील शेतकरी बांधवांच्या शेती पिकाचे पूर्णपणे नुकसान झाले आहे, रिसोड व मालेगाव तालुक्यात तब्बल सहा वेळा अतिवृष्टीने शेतकरी बांधवांना नुकसानीचा फटका सहन करावा लागलेला आहे आणि आता तर शेतकऱ्याच्या पिकाचे संपूर्णपणे नुकसान झालेले आहे त्यामुळे शेतकरी बांधवांना तात्काळ सरसकट मदत देण्यात यावी यासाठी भाजप नेते नकुल देशमुख यांनी पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासोबत प्रवासादरम्यान आणि पाहणी दरम्यान चर्चा केली. महायुती सरकार शेतकऱ्याच्या ठामपणे पाठीशी आहे. नुकसानीचा संपूर्ण मोबदला शेतकरी बांधवांना दिल्या जाणार असल्याबाबत रिसोड मालेगाव विधानसभा क्षेत्रातील शेतकरी बांधवांना कृषिमंत्री तथा पालकमंत्री वाशिम जिल्हा यांनी आश्वस्त केले. यावेळी वाशिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्याम खोडे, भाजप जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, भाजपा जिल्हा महामंत्री गजाननराव लाटे, रिसोड ग्रामीण मंडळाचे अध्यक्ष सुभाष खरात, भाजप गोवर्धन मंडळाध्यक्ष अमोल पाटील भुतेकर, पंचायत समिती सदस्य भूषण पाटील दांदडे, अँड गजाननराव देशमुख, प्रकाश आटोळे, संदीप गुंजकर, गणेश भांदुर्गे, सुभाषराव सरोदे सहित रिसोड मालेगाव विधानसभा मतदारसंघात नुकसानग्रस्त भागाची पाहणीदरम्यान ठीक ठिकाणी भारतीय जनतापक्षाचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.



# सैलानी जाणाऱ्या भक्तांच्या वाहनाचा रिसोड येथे अपघात

**रिसोड, दि. २४ (प्रतिनिधी)**

लातूर जिल्ह्यातील भक्तांना सैलानी दर्शनला घेऊन जात असलेला रस्ता भरकटलेला मालवाहू वाहन चालकाचे नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या कडेला जाऊन पलटी झाला. सदर अपघातात तीन महिला जखमी झाल्या आहेत. सदर घटना ही घटना २३ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता घडली. आपघातामध्ये काही लहान मुलांचा सुद्धा समावेश आहे. सदर वाहनांमध्ये १० ते १२ प्रवासी प्रवास करत होते.

प्राप्त माहितीनुसार बुलढाणा जिल्ह्यातील सैलानीला दर्शनासाठी जात होते. मात्र, सैलानीला जाण्याऐवजी रस्ता भरकटून ते सेनगाव मार्गाच्या दिशेने निघाले असता रिसोड सेनगाव मार्गावर मुंगसाजीनगर जवळ त्यांच्या मालवाहू वाहन पलटी झाले. या घटनेमध्ये सत्यशीला भारत गायकवाड वय ३५,लक्ष्मी नामदेव वाघमारे वय ६० दोघेही रा. चाकूर जि. लातूर, सुरेखा माणिक वाघमारे वय ५० रा.जाब ता.चाकूर जि.लातूर अशी जखमी महिलांचे नाव असून त्यांना रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात भरती करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी सर्व प्रवाशांना सदर टाटा एस. वाहनातून बाहेर काढले.यामध्ये काही लहान मुलांना सुद्धा समावेश असून त्यांना काही गंभीर दुखापत झाली नाही. बाकी अन्य प्रवासी हे त्यांच्यासोबत असलेल्या दुसऱ्या एका पिकप वाहनांमधून निघून गेले तर जखमींचा रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहे. त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. सदर सर्व भक्तमंडळी हे लातूर जिल्ह्यातून बुलढाणा जिल्ह्यातील सैलानी दर्शनला निघाले होते. मात्र, चालकाला रस्ता सुचला नाही व तो थेट हिंगोली मार्गाच्या दिशेने निघाला.मात्र, या ठिकाणी वाहना वरील चालकाचे नियंत्रण सुटले व सदर घटना घडली अशी माहिती जखमी पैकी एका महिलेने दिली आहे.




# लोणी बुद्रुक येथे भरला ट्रॅक्टरचा पोळा




## यांत्रिकीकरणाकडे वाढला शेतकऱ्यांचा कल

**रिसोड ,** –

रिसोड:श्रावण महिना म्हणजे सणांची रेलचेल असणारा महिना याच श्रावण महिन्यात पिठोरी अमावस्येला संपूर्ण राज्यामध्ये बैल पोळ्याचा सण साजरा केला जातो. मात्र हल्ली शेतकऱ्यांचा कल हा यांत्रिकीकरणाकडे वाढल्याने रिसोड तालुक्यातील लोणी बुद्रुक येथे ता.२२ रोजी सायंकाळी ७ वाजता ट्रॅक्टरचा पोळा भरविण्यात आला होता.रिसोड तालुक्यातील श्रीक्षेत्र लोणी बुद्रुक येथे बैल पोळ्याची जागा वाढत्या यांत्रिकीकरणामुळे ट्रॅक्टरने घेतली.शेतीच्या कामासाठी शेतकरी एकेकाळी बैलांचा वापर करत मात्र बदलत्या काळाबरोबर शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात ट्रॅक्टर खरेदी केल्याने लोणी गावामध्ये बैल पोळ्याच्या ठिकाणापासून ट्रॅक्टर च्या पोळ्याला सुरुवात करत ढोल ताश्याच्या धूमधडाक्यात सुरुवात करत संपूर्ण गावातून ग्राम प्रदक्षिणा करत मारोती मंदिर, सखाराम महाराज मंदिरा जवळ ट्रॅक्टर पोळ्याच्या समारोप करण्यात आला.

पूर्वी बैलाने केली जाणारी शेतीचे कामे आता ट्रॅक्टरच्या सहाय्याने केल्या जातात. त्यामुळे वेळेची बचत होत कमी जलद गतीने शेतीची कामे करणे सुकर झाले आहे. ज्या ट्रॅक्टरच्या सहाय्याने आपण वर्षभर आपल्या शेतातील कामे करून घेतो.त्या वाहना बद्दल कृतज्ञता म्हणून आजचा हा ट्रॅक्टर पोळ्याच्या सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या ट्रॅक्टर पोळ्यात गावातील तब्बल पन्नासहून अधिक ट्रॅक्टर सहभागी झाले होते.

**पंडित बोडखे**
**लोणी बुद्रुक**

पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक ) I R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

